## Kesaari, August 28, 2011

# टीसीएस आयटी वीझ-२०११ पुणे फेरीचे विजेतेपद आर्मी स्कूलला

पुणे : टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसने (टीसीएस) आयोजित केलेल्या टीसीएस आयटी वीझच्या विभागीय फेरीला पुण्यातील ४५ शाळांमधून प्रचंड प्रतिसाद मिळाला. पुण्यातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे मंगळवारी भारतातील सर्वांत मोठी आंतरशालेय आयटी क्वीझ म्हणून नावाजल्या जाणाऱ्या टीसीएस आयटी वीझची पुणे फेरी आयोजित करण्यात आली होती. ८५० हून अधिक विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते.

प्राथमिक फेरीतील क्वीझिंगच्या अवघड फेऱ्या यशस्वीपणे पार करून आर्मी पब्लिक स्कूलच्या ग्यानेंद्र मिश्रा व एस. ऋषीराज यांनी विनर्स ट्रॉफीवर आपले नाव कोरले. ट्रॉफीच्या व्यतिरिक्त या दोघांनाही प्रत्येकी एक-एक गॅलेक्सी टॅबलेट व डिजिटल कॅमेरा बक्षीस म्हणून देण्यात आले. त्यांच्या पाठोपाठ त्यांना कट्टर लढत देत मॉडर्न ज्युनिअर कॉलेज स्कूलच्या तनय चांदकर व विषाद डावखर यांनी उपविजेतेपद पटकावले. या दोघांना बक्षीस म्हणून चषक व आयपॉड टच देण्यात आले. सुझलॉन एनर्जी लिमिटेड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष शिरिष गोडबोले, पुण्याच्या कॉलेज ऑफ इंजिनियरिंगचे संचालक प्रोफेसर ए. सहस्त्रबुद्धे यांच्याबरोबरीनेच टीसीएसचे सेंटर हेड अरविंद पाध्ये व टीसीएसचे उपाध्यक्ष प्रोफेसर हॅरिक विन यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

टीसीएस आयटी वीझ-२०११ च्या विभागीय फेऱ्या या बारा शहरांमध्ये आयोजित करण्यात आल्या आहेत. हैदराबाद, अहमदाबाद, बंगलोर, चेन्नई, कोईमतूर, पुणे, कोलकता, भुवनेश्वर, कोची, लखनौ, दिल्ली व मुंबई या विभागीय फेऱ्यांनंतर डिसेंबर महिन्यात राष्ट्रीय स्तरावर अंतिम फेरीचे आयोजन केले जाईल. या अंतिम फेरीत विभागीय स्तरांवर विजेते ठरलेले १२ संघ टीसीएस आयटी वीझ नॅशनल चॅम्पियन हा किताब मिळविण्यासाठी आमने-सामने येतील. या १२ भाग्यशाली संघांना राष्ट्रीय अंतिम फेरीदरम्यान टीसीएसचे सीईओ एन. चंद्रशेखरन यांनाही भेटण्याची संधी मिळणार आहे.